भारतीय कोर्ट फी

भारत 200 रु. दो सौ रुपये

INDIA Rs.200 TWO HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

INDIA COURT FEE

महाराष्ट्र MAHARASHTRA B 150810

अ.क्र. दिनांक किंमत

सुनिल सु. बिदरे
मुद्रांक विक्रेता परवाना क्र.
जिल्हा न्यायालय, बीड

जिल्हा कोषागार कार्यालय, बीड
12 AUG 2026
मुद्रांक प्रमुख लिपीक
कोषागार कार्यालय, बीड

<u>बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बीड यांचे न्यायालयात</u>

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ९३४/२०२६
रत्नमाला व इतर वि. निरंक
<u>निकाल तारीख :— १४/०८/२०२६</u>

## — :: वारस प्रमाणपत्र :: —

( मुंबई वारसा १८२७ कायद्याचे कलम २ प्रमाणे )

अर्जदार :—

१. **रत्नमाला भ्र. पांडुरंग इंदुरकर,** वय — ७२ वर्षे, धंदा — घरकाम,
रा. राही स्मृती, सहयोग नगर, डी.पी.रोड, बीड, ता.जि.बीड,
२. **प्रिती भ्र. संजीव चिंचोली,** वय — ५२ वर्षे, धंदा — घरकाम,
रा. संतगुरु कृपा, एम.जी.रोड, एस.जी.एन.पी.यु.कॉलेजजवळ, बसवेश्वर कॉलनी,
गुलबर्गा (कर्नाटक राज्य)
३. **प्रिया भ्र. मनिष चौडेकर,** वय — ४९ वर्षे, धंदा — घरकाम,
रा. हनुमान मंदिरा जवळ, विवेक नगर, नांदेड

मागील पानावर ...

ज्याअर्थी मयत नामे **पांडुरंग पि. किशनराव इंदुरकर** हे दिनांक ११/०५/२०२६ रोजी विवेकानंद हॉस्पीटल, बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार क्र. २ व ३ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत.

अर्जातील कथनास व विनंतीस कोणाचा आक्षेप आहे किंवा नाही हे पडताळून पहाणे करीता अर्जातील मजकूर जाहिर प्रगटणाव्दारे स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आला. सदर जाहीर प्रगटन प्रसिध्दीस दिले असता कोणीही आक्षेप घेतला नाही. शपथपत्राव्दारे साक्षीपुरावा, अभिलेखावरील उपलब्ध बाबी व निवेदनाचा विचार करुन त्यावर योग्य तो आदेश पारीत करुन अर्ज मंजूर करण्यात आला.

त्याअर्थी प्रमाणपत्र देण्यात येते की, वरील **अर्जदार क्र. १ ते ३** हे मयत नामे **पांडुरंग पि. किशनराव इंदुरकर** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र अर्जदारांच्या नावे जारी करण्यात येत आहे.

आज दिनांक **२०/०८/२०२६** रोजी माझे स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

२०/०८/२०२६

**(रफीक अ. शेख)**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
बीड

टिप :—

दिवाणी संहिता प्रकरण गट भाग ३१३ अन्वये दिवाणी किरकोळ अर्ज मधील पक्षकारांना याव्दारे सूचीत करण्यात येते की, ज्याअर्थी मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ अन्वये तुम्हाला वारस दाखला देणेत आला आहे आणि ज्याअर्थी मिळकतींचा तपशील न्यायालयाकडे सादर केलेला नाही. त्याअर्थी, तुम्हाला निर्देशित करणेत येते की, अशा मागाहून माहित झालेल्या मिळकतींचा खरा व पूर्ण तपशिल तुम्ही ६ महिन्याच्या आत या न्यायालयात सादर करावा. तसेच या प्रमाणपत्रा आधारे आपणास प्राप्त होणा—या मिळकतींचा हिशोब १ वर्षाच्या आत या न्यायालयात सादर करावा. तुम्ही तसे करणेत कसूर केलात तर तुम्ही भारतीय वारसा कायदा सन १९२५ कलम ३१७ व ३९० नुसार भारतीय दंड विधान संहिता कलम १७६ अन्वये गुन्हयास पात्र ठराल.

२०/०८/२०२६

**(रफीक अ. शेख)**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
बीड